# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**
**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता.जि.ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

**प्रेसनोट २३६-२२** **दिनांक ०३/०८/२०२२**

## खंडणीसाठी अल्पवयीन मुलाचे अपहरण करुन त्यास जिवे ठार मारणाऱ्या २ आरोपीतांना चोवीस तासाचे आत अटक.

दिनांक ०१.०८.२०२२ रोजी काशिमिरा पोलीस ठाणे येथे तक्रारदार यांनी तक्रार दिली की, मयंक विष्णू ठाकुर वय-१३ वर्षे रा. क्लष्टर सोसायटी, बालाजी हॉटेल समोर, शांतापार्क, काशिमिरा हा दिनांक ३१/०७/२०२२ रोजी सायंकाळच्या सुमारास घराबाहेर गेला असून रात्री २२:०० वाजेपर्यंत घरी आलेला नाही. त्यामुळे त्याचे कुणीतरी अज्ञात इसमाने अपहरण केलेले आहे बाबत तक्रार दिल्याने काशिमिरा पोलीस ठाणे येथे I गुरनं ५३१/२०२२ भादंविक ३६३ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेवून अपहरण झालेल्या अल्पवयीन बालकाचा शोध घेण्याकरिता काशिमिरा पोलीस स्टेशनच्या तपास पथकाने वेगवेगळया दृष्टीकोनातून तपास करण्यास सुरुवात केली. सदर गुन्हयाचा तपास चालू असतांना गुन्हयातील अज्ञात आरोपींनी अल्पवयीन बालकाच्या पालकांना फोन करुन ३५,००,०००/- (पस्तीस लाख रुपये) रुपयांची मागणी करुन तुमचा मुलगा ७ दिवसामध्ये मिळून येईल असे सांगीतले. त्यामुळे सदर गुन्हयाचे अधिक गांभीर्य लक्षात घेवून वरिष्ठ पोलीस अधिकारी यांनी काशिमिरा पोलीस स्टेशनच्या तपास पथकाला अधिक सतर्क सुचना देवून सदरचा गुन्हा तात्काळ उघडकीस करण्याबाबत सुचना व मार्गदर्शन केले. त्याअनुषंगाने तपास पथकातील पोलीस अधिकारी/अंमलदार यांनी दिवसरात्र मेहनत करुन गुप्त माहितगार व तांत्रीक मदतीच्या आधारे संशईतांबाबत माहिती प्राप्त करुन आरोपी नामे १) अफजल मोहम्मद हनीफ अन्सारी, वय-२२ वर्षे, रा. सध्या फिरस्ता, पुनमसागर, कब्रस्तानचे बाजुला मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे २) इम्रान नुरहसन शेख, वय-२५ वर्षे, रा. कुरेशीचाळ, मुन्शी कम्पाऊंड, काशिमीरा, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे यांना सापळा रचुन ताब्यात घेतले. सदर आरोपीतांकडे कौशल्यपुर्वक विचारपुस केली असता, त्यांनी यातील अल्पवयीन बालकास 'तुला फिरवून आणतो व मोबाईल फोन देतो' असे बोलून त्याय मोटारसायकलवर बसवून अपहरण केले व त्यानंतर अल्पवयीन बालकास वालीव पोलीस ठाणे हद्दीतील वासाड्या ब्रिजच्या खाली फेकून दिले मात्र सदरचा मुलगा मयत न झाल्याने त्याचे पोटावर तिक्ष्ण हत्याराने वार करुन जिवे ठार मारले. अशी प्राथमिक माहिती आरोपीतांनी दिल्याने तात्काळ त्याबाबत खात्री केली असता यातील अल्पवयीन बालकाचा मृतदेह दिनांक २/८/२०२२ रोजी मिळून आल्याने सदर गुन्हयास तपासामध्ये भादंवि ३०२, ३८७, १२० (ब) व २०१ हे वाढीव कलम लावण्यात आले आहे. सदर आरोपीतांना अटक करुन दिनांक ०२/०८/२०२२ रोजी अटक करण्यात आली असून त्यांना दिनांक ६/०७/२०२२ रोजीपावेतो पोलीस कोठडी रिमांड मंजुर करण्यात आला आहे. सदर गुन्हयाचा पुढिल तपास काशिमिरा पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री संजय हजारे हे करित आहे.

सदरचा संवेदनशिल गुन्हा उघडकीस आणण्याबाबतची कामगिरी श्री. अमित काळे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-०१, श्री. विलास सानप, सहा. पोलीस आयुक्त, मिरारोड विभाग यांचे मार्गदर्शनाखाली काशिमीरा पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. संजय हजारे, श्री. प्रशांत गागुर्डे, सहा. पोलीस निरीक्षक, पोउपनी. श्री निखील चव्हाण, सपोउपनी दिनकर कोल्हे, अमोल जाधव, सागर साबळे, प्रकाश कावरे, पोना. सचिन हुले, पोकॉ. निलेश शिंदे, परेश पाटील, हनुमंत थेरवे, पोना. विश्वनाथ जरग, पोशि.सुधीर खोत, राहुल सोनकांबळे, रवि कांबळे यांनी केली आहे.